# बायको नावाची मास्तरीण

माझं लग्न झालं तेंव्हा बायकोच्या तोंडून जेंव्हा, - मी सारखं तुम्हाला सांगते तरी तुम्हाला नाहीच कसे कळत नाही? - हे शब्द कानांवर आदळायला लागले, तेंव्हापासून माझी शिकवणी सुरु झाली.

बाळ गंगाधरांनी म्हटलंय की, 'मनुष्य हा जन्मभर विद्यार्थीच असतो.' लहानपणी त्याचा गंभीर अर्थ कळला नव्हता. पण आता तो खरा कळायला लागलाय!

माझ्या शिकवणीचे वेळापत्रक-

पहाटेची वेळ साखरझोपेची! त्यातून, रोज सकाळी सर्वसामान्य जनता घड्याळाच्या गजराने उठते. आमच्याकडे इतका साधा उपाय नाही. हिला नेमकं त्याच वेळेस वेद पठण करण्याची लहर येते! ही उठली की आधी सी डी प्लेअरकडे धावणार. जो दिवस असेल त्याप्रमाणे त्या ठराविक देवांची स्तोत्रे तिच्या घडवंचीत एका रांगेत दक्ष खडी असतात. उदा. सोमवारी रुद्र (त्यात रावणाचे तांडवही आले बरं का), मंगळवारी श्रीसुक्त, बुधवारी अथर्वशीर्ष, गुरुवारी विष्णुसहस्त्रनाम, शुक्रवारी देवीची आरती, शनिवारी हनुमान चालीसा, तुम्हाला वाटेल रविवारी तरी मला उशिरा झोपायला मोकळीक, पण तेवढे कुठचे भाग्य? रविवारी गायत्री मंत्राचा पाठ तोही १०८ वेळा.

अशा त-हेने आमच्याकडे संगीत आणि आध्यात्मिक सुप्रभात आळवायला लागते. नि त्याचबरोबर त्या बिचा-या सगळ्या देवांना जागं होण्याची सक्ती करते. बरं कानाला हेडफोन लावून हिने ऐकले तर कशी अध्यात्मिक जाग यावी यासाठी तो सी डी प्लेअर मोठ्ठ्याने लावलेला असतो.

मग मी चडफडत उठतो. हिची कोप-यातल्या खुर्चीवर ध्यानस्त मूर्ती बसलेली दिसते.

रात्रभरचा उपवास सोडावा हया विचाराने मी स्वयंपाकघरात येतो. चहासाठी विजेची किटली चालू करतो. हिला आल्याचा चहा आवडतो म्हणून मी एकीकडे खलबत्त्यात आले कुटायला सुरुवात करतो.

हिचे ध्यान भंग पावून ती मला तिचे आधीच मोठे असलेले डोळे वटारून खुणावू लागते. मग काहीतरी सांगू लागते. सी डी प्लेअरचा भसाडा सूर, विजेची कर्कश्य शिटी यांत मला कसे कळणार ती काय बोलते आहे ते? मला ऐकू येत नाही. म्हणून मी सूचकतेने सी डी प्लेअरचा गळा बंद करतो. अन् मग मात्र आमच्या दिवसाची सुरुवात काहीशी खडाष्टकानेच सुरु होते.

मी तिथून निमूटपणे स्नानगृहाकडे जातो. मनसोक्त आंघोळ करावी म्हणून गरम शॉवर चालू करतो. आमच्या नळाला दिवसातून एकदाच गंगा यायची, अमेरिकेत २४ तास पाणी असते. माझं स्नान संगीत एकदम रंगत असतं. तोच हिची आरोळी अल गोरनी सांगितलंय आपण सगळ्यांनी आता कमी

पाणी वापरायचं बरं का!

हिचा गव्हाळी रंग लवकरच पक्का हिरवा होणार आहे. सकाळची न्याहरी दोघांनी एकत्र खावी असा तिचा नेहमीप्रमाणे हट्ट. माझ्या वेगाने मी भराभरा आवरत असतो. तर ही घड्याळाकडे बोट दाखवून म्हणते, अहो चेंगटस्वामी, किती वेळ मी खोळंबलेय?

मी बिचारा माझा खास आवडीचा लाल रंगाचा शर्ट, त्याखाली तपकिरी रंगाची पँट, राखाडी रंगाचा स्वेटर आणि निळे मोजे असा परिवेश घारण करून किचनमध्ये प्रवेश करतो. ही माझ्याकडे एकच कटाक्ष फेकते, - हे कपडे घातलेस? अरे, तुला मॅचिंग कशाशी खातात हे अजून समजत नाही? लग्न व्हायच्या आधी, माझं कपाट, पांढरे शर्ट व खाकी, काळ्या अथवा निळ्या पँट्स् या रंगसंगतीने नटलेले असे. पण बायको चित्रकार असावी, हा कोणे एकेकाळी माझा गोड हट्ट होता त्याचा दंड मी असा भोगतो आहे.

आम्ही दोघं न्याहरी करायला सुरुवात करणार, तर ही न को तो नेमका प्रश्न विचारते, मेडिटेशन केलंस का? मी तिच्याकडे बघून हसत असतो, अगं जन्मभर जगदंबेचं ध्यान करतोय, पण साली (माझी नकळत जीभ कचकन् चावते) अजून माझ्यावर प्रसन्नच होत नाही.

मस्करी करु नकोस. आज एकादशी म्हणून हे भजन लावकंय, बरं निदान सांग, राग कुठला आहे? आली की पंचाईत! आधी हे शास्त्रीय संगीत पचवायचं अन् वरती राग ओळखायची परीक्षा. मी तिला अनुरागाने खुलवायचा परत प्रयत्न करतो.

आटप लवकर नाहीतर आपल्याला उशीर होईल. फर्नीचरचा सेल आलाय. आपला सोफा जुना झालाय. शिवाय परवा लीलाकडे गेलो तंव्हा तिच्याकडे अगदी अस्साच होता. तिचा हा एक आणखीन् हट्ट जे दुस-याकडे नाही तेच फक्त आपल्याकडे ठेवायचे, त्यामुळे आमचे घर, हिने गराजसेलमधून लोकांनी टाकलेल्या वस्तूंनी, फार हौसेने सजले आहे.

हिला कुठे कच-यातून कला दिसेल ह्याचा नेम नाही. अहो, पिस्ते खाल्ल्यावर त्यांची सालंसुध्दा ही जपून ठेवते. पग त्या सालांच्या वेलबुट्ट्यांची रांगोळी आमच्या बागेत उगवते. आम्ही कुठेही गेलो की मी ओझे वाहणारा चार पायांचा XXX होतो. कारण हिला दगड धोंड्यांचा फार शौक. मग ते दगड घरी आणण्याची वजनदार जोखीम माझ्यावरच. ती त्यांना न्हाई माखू घालते, त्यावर मेडिटेशन करते, मग म्हणे तो दगड तिला साक्षात्कार देतो. मग केवळ कुंचल्याचे एकदोन फटकारे मारून, त्यातून ती जादूने एखादा पशूप्राणी, मानवाचे अवयव, इ. तयार करते. तेंव्हाही पहिल्या फटक्यात ते प्राणी ओळखायची परीक्षा मला द्यायलाच लागते.

आमच्या घरात झाडांच्या फांद्या, वाळलेली फुले, प्राण्यांची शिंगे इ.ची जागोजागी फें श्वे तुम्हाला

आढळतील. लोकांच्या घरात पुष्पगुच्छ शोभा देत असतात, तर आमच्याकडे, आल्याचा गड्डा, तुकतुकीत जांभळेभोर हिरव्या लांब देठाचे वांगे, अर्धाच कापलेला लाल कोबी इ. विरळ आणि विअर्ड गोष्टी टेबलावर शेभत असतात कलेच्या बुरख्याखाली. कधी चुकून माझा धक्का लागून त्यातील पान, काडी हालली तर तिच्या काक नजतेतून ते सुटत नाही. ती लगेच ते सरळ करते.

जेवायला कोणाला बोलावले, की त्यावेळी आमच्या घरात फक्त- ज्योतीचाच- उजेड! (म्हणजे लग्नात मीच तिचे नाव हट्टाने, निशाचे ज्योती बदलले होते). सगळीकडे मेणबत्त्या, समयांचाच अंधुकसा प्रकाश असतो वातावरण निर्मीतीसाठी. चक्क एकदा पाहुण्यांनी विचारले, -अहो वीज गेली आहे का?

तिचा एकंदर दिनक्रम पाहिला तर खरं म्हणजे ही एखाद्या आर्मीची प्रमुख म्हणून उत्तम काम करु शकेल. शिस्तीची अत्यंत भोक्ती. व्यायामाचा हव्यास! रोज उठून योगासने, प्राणायाम, ध्यान, पोहणे, बाहेर पायी फिरायला जाणे इ.इ. तिच्या सवयी ती नेमाने पाळतेच पण मी ही तिच्याबरोबर कराव्यात ही तिची अपेक्षा असते.

हिला केव्हा कोण रस्त्यातला माणूस तिच्या भाऊ, मामा, मावशी आरखे दिसतील याचा नेम नाही. बराच वेळ मी तिने दाखवलेल्या माणसात आणि तिच्या नातेवाईकाचे काही साम्य आहे का ते बघायला लागतो. (खरं तर कुठचा मामा, हे ही मला आठवत नसतं. तिच्या माहेरी तसा नातेवाईकांचा सुकाळच आहे). शेवटी ती मला हळूच सांगते, त्याची डावी नाकपुडी बघ अगदी हुबेहुब, अन् अरे त्याचं नाक बघ, जरासं मोठं असतं ना आणि कान जरा लहान असते ना, तर तो अगदी शेजारच्या तात्यांसारखा दिसला असता! तिची मान जरा उंच असती ना, तर अगदी आमच्या तारी मावशीसारखीच. मला समजले नाही साम्य. आर्टस्कूलमधे उगाच नाही पोर्ट्रेट केली. असा फटकाराही त्या पाठोपाठ मिळतो.

पक्षी, प्राणी, फुले, तारे बघून ही मला रस्त्यांच्या कडेला गाडी कुठेही थांबावयास भाग पाडते. पण परवा तर कमालच केलीन. गाडी चालवताना ही एकदम मध्येच (नेहमीप्रमाणे) ओरडली. अरे, अरे, तो चंद्र बघ! हिचे ओरडणे हे असेच. ऐकणा-याला वाटावं काहीतरी घोटाळा झालाय. मी एकदम दचकून ब्रेक दाबले. बहुतेक चंद्र माझ्या गाडीखाली आला अशी भिती वाटली. बेसावधपणे मी विचारले, -कुठे, कुठे?

कप्पाळ तुझं, चंद्र कुठे असणार? आभाळात! अरे आज पौर्णिमा नाही का? मुलींना फोन करून सांगायला पाहिजे. ही लगेच मोबाईल सरसावते.

हिचे हे चंद्रवेडेपण स्वत:पुरते मर्यादित नसते. आमच्या शेजारी राहणा-या आजींनाही हिने पौर्णिमेचे चंद्रबिंब न्याहाळण्याची ताकीद दिलीय. त्या बिचा-या आजीनी म्हणे असे ताटाएवढे चंद्रबिंब या आधी अधीही पाहिले नव्हते. आता त्या महिन्यातून दोनदा तिला फोन करुन सांगतात चंद्रबिंब पाहिले

म्हणून.

आमजनतेने तो चंद्र पाहून पाझरावं अन् कोल्हेकुई करावी ही तिची परत सक्तीची अट. तिचा एक चंद्रकल्ट आहे. एवढेच नव्हे तर हीने तिच्या इतर वेड्या मैत्रिणींनाही त्यात भरती केले आहे. तसंच आमच्या मुलींनाही या कटात सामील केले आहे. मोठी आमची, तिने असे पौर्णिमेचे चंद्रबिंब उगवताना पाहिले म्हणजे वाटेत मधेच रस्त्यात थांबून मातेला वार्ता देते. मग आमची ही दुस-या कन्यकेला दूरध्वनीने कळवणार, मग त्या कन्यकेतील अनंतकालची माता जागृत होऊन ती आमच्या नातवाला झोपेतून उठवून जागे करणार नि मग हे सर्व मूनकेझी, - चांदोबा, चांदोबा भागलास का... चे सरगम् आपल्या सुरेल (?) आवाजात गाणार. माझ्यावर अरसिकपणाचा शिक्का लादलेला आहेच. तरीसुधा मला निमूटपणे त्या महफिलीला दाद द्यावी लागते.

हिला कधी स्फूर्ती येईल, याचा नेम नाही. मग त्या प्रसुतीवेदना सुरु झाल्या की एकदम मध्येच ती हातातले काम टाकून रंगाचा ब्रश घेते नि बजावते, आता मी तुझी कुणी नाही बरं का? मी लगेच शाळेला सुट्टी मिळाल्याच्या आनंदात सुटकेचा निश्वास टाकतो.

पण खरं सांगू का? ही परवा माहेरी गेलीय भारतात. तेव्हा मात्र हिची शिकवणी नसल्याने ही सक्तीची रजा बरी नाही वाटत. घर कसं सुनं सुनं वाटतंय. आंघोळ झाल्यावर ओला टॉवेल पलंगावर टाकायला मजा नाही. वर्तमान पत्र वाचल्यावर नेहमीप्रमाणे तो पत्रावळीसारखा पसरू शकलो नाही. मित्राकडे जेवायला गेल्यावर, त्याच्या घराच्या पांढ-या भिंतींनी मला बेजार केलं नकळत. मग घरी आल्यावर हिने हट्टाने रंगवलेली, वेगळ्या वेगळ्या रंगाची प्रत्येक भिंत मला खुणावत राहिली! घरातले रोजचे संगीताचे सूर आज नसल्याने ह्या भयाण शांततेने मला हुरहुर लावली.

जुने संस्कृत सुभाषित बदलून, म्हणावेसे वाटते, रसिक भार्या शिरसि लिख, शिरसि लिख! शिरसि लिख!

**- ज्योती जोशी**

(पूर्वप्रसिध्दी 'रंगदीप' २०११)